८ गुरुवार, ३१ ऑगस्ट २०२३

पुढारी


# राजगुरू महाविद्यालयात मॅरेथॉन स्पर्धा

राजगुरूनगर : पुढारी वृत्तसेवा

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. वरिष्ठ गटात मुलांमध्ये राहुल पारधी, तर मुलींमध्ये साक्षी कोहिनकर, कनिष्ठ गटात मुलांमध्ये रोहन कोरडे, तर मुलींमध्ये वैष्णवी होले यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

वरिष्ठ गटात द्वितीय क्रमांक ऋतिक इंगळे आणि मुलींमध्ये साक्षी भांबुरे यांचा, तर कनिष्ठ गटात आकाश शिंदे आणि चैताली होले यांनी मिळवला. तृतीय क्रमांक मुलांमध्ये सौरभ मुळूक आणि मुलींमध्ये मयूरी गाढवे आणि कनिष्ठ गटात अनिकेत घावटे आणि नम्रता बेंदुरे यांनी पटकाविला.

स्पर्धेचे उद्घाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, अरविंद दौंडकर, चांडोली ग्रामीण रुग्णालयाचे डॉ. अशोक बारगजे, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, एसबीएमचे प्राचार्य डॉ. एच. एम.जरे उपप्राचार्य प्रा.व्ही.बी दौंडकर, क्रीडाशिक्षक प्रा.प्रतिमा लोणारी, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. विद्यार्थ्यांसाठी पाच किलोमीटर, तर विद्यार्थिनींसाठी तीन किलोमीटर अंतराची स्पर्धा झाली. या स्पर्धेत सुमारे ४०० खेळाडूंनी सहभाग घेतला.



विजयी खेळाडूंना सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात आले.

विजयी खेळाडूंचा सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्रक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेचे आयोजन प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. तानाजी पिंगळे, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते, प्रा. दिलीप गुप्ता यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.एम.एल.मुळूक यांनी केले.

Scanned with OKEN Scanner